: प्रकरण पहिले :

# महात्मा जोतिबा फुले : तत्कालीन समाजव्यवस्था आणि संस्कृतीचा अभ्यास

: प्रकरण 1 ले :

# महात्मा जोतिबा फुले : तत्कालीन समाजव्यवस्था आणि संस्कृतीचा अभ्यास

महात्मा जोतीबा फुले यांचे स्त्रीसंदर्भातील विचार अभ्यासण्यापूर्वी तसेच त्यांच्या जीवनपरिचयाकडे वळण्यापूर्वी भारतीय संस्कृती आणि फुलेंच्या तत्कालीन समाज व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

भारतीय संस्कृती ही जगातील अत्यंत प्राचीन संस्कृतीपैकी एक संस्कृती आहे. अनेक प्राचीन संस्कृती या अस्ताला गेल्या, अशा अनेक संस्कृती पैकी एक महत्त्वाची. त्या संस्कृतीच्या काळातच विकास पावणारी, स्थिरावणारी अशी ही भारतीय संस्कृती आजतागायत आहे. जगात अत्यंत प्राचीन संस्कृती ज्या अखंडपणे अजून चालू आहेत. त्या म्हणजे चीनी संस्कृती व भारतीय संस्कृती, भारतीय संस्कृतीचा इतिहास हा 5000 वर्षाचा आहे. [1] भारतीय संस्कृतीत विविध कालखंडात झालेले बदल हे अनेक ग्रंथात ज्या त्या काळात लिहीलेली आढळून येतात यावरून त्या काळात असणारी समाजव्यवस्था, वर्ण, जाती भेद, वर्गव्यवस्था असणारे हक्क, अधिकार या सर्व गोष्टीबद्दल व संस्कृतीबद्दल सहज माहीती उपलब्ध होते.

भारतीय संस्कृतीचा विचार करताना आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हिंदू हा शब्द आपल्याला धर्मशास्त्रात आढळत नाही. आपल्या ऋषीमुनींनी जी ग्रंथसंपदा निर्माण केली. ती विशिष्ट संप्रदायासाठी नसून सबंध मानवजीतीसाठीच होती. हिंदू हा खर तर सिंधूचा अपभ्रंश आहे. खैबरखिंड ओलांडून भारतात आलेल्या इराणी लोकांनी पाहिलेली सर्वात मोठी नदी म्हणजे सिंधू, आणि म्हणून ते 'सिंधू' वरून 'हिंदू' म्हणू लागले. [2] या संदर्भात प्रा. द. के. केळकर म्हणतात, 'संस्कृति' या शब्दाइतका व्यापक अर्थबोधक शब्द क्वचितच असेल. या शब्दाने कोणत्याही समाजाच्या सर्व आचारविचारांचे, त्याच्या

आर्थिक व्यापाचे, त्याच्या शास्त्र व कला यांच्या उपासनेचे, समाजधारणाने प्रवर्तित केलेल्या धर्म नीती व कायदेकानून यांचे व त्यांचे जीवनविषयक तत्वज्ञान इ. सर्व अंगोपांगांचे एकसमयावच्छेदेकरून दिग्दर्शन होते. कोणत्याही वस्तूवर व्यक्तीमत्वाचा संस्कार उठविणे यात मानवाचे मानव्य साठलेले आहे ---अर्थात अंत:सृष्टी आणि बाह्यसृष्टी ज्या ज्या गोष्टींवर त्याने आपल्या मानण्याची संस्कार-मुद्रा ठोकलेली आहे, त्या त्या सर्व गोष्टींचा कलाप म्हणजे संस्कृति होय. [3] आणि यामुळेच भारतीय संस्कृतीचा एकंदर आढावा घेत असताना अगदी वेद कालीन संस्कृतिपासून विचार केला पाहिजे.

हिंदू संस्कृती ही एक ईश्वर, एक प्रेषित, एक धर्मग्रंथ मानणारी अशी एकात्मरूपी एकसंघ संस्कृती नसून, हिंदू संस्कृति हा 'हिंदू' या एकाच नावाखाली वावरणारा अनेक संस्कृतींचा समुच्चय आहे. हिंदू संस्कृतीमध्ये अनेक मतांचा पुरस्कार करणारे असंख्य पंथ, संप्रदाय इ. चा अंतर्भाव आहे. येथे ईश्वरवादी-अनईश्वरवादी, द्वैती-अद्वैती, वैदिक-अवैदिक आहेत. या सर्वांच्या उपास्यदेवता भिन्न, आचारपद्धती, तत्वज्ञाने भिन्न अशी परिस्थिती आहे. परंतु इतर बाबतीत आपापले वेगळेपण जपणाऱ्या या सर्व पंथांचे, प्रवाहांचे एका बाबतीत मात्र बहुतांशी एकमत आहे. ती बाब म्हणजे पुरूषाचे सुख हे साध्य असून स्त्री हे त्या सुखाच्या अनेक साधनांपैकी एक महत्त्वाचे साधन आहे आणि अर्थातच साधनभूत अशा तिच्या सुखाचा स्वतंत्रपणे विचार करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

या विचारसरणीला एक क्षीण प्रवाहाचा अपवाद आहे. या प्रवाहाचा संबंध एकेकाळी भारतात अत्यंत प्रभावी असलेल्या मातृसत्ताक पद्धतीशी आहे. पुरूषप्रधान आर्य हे भारतात येण्यापूर्वी येथे स्थिरावलेल्या अनार्यांमधील काही लोकांमध्ये हि मातृसत्ताक पद्धत रूढ होती. मानवी संस्कृतीचा एक टप्पा असा होता की जेंव्हा अपत्यनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये पुरूषाचे काही स्थान असते, हे माणसाला उमगलेले नव्हते. स्त्रीमध्ये आपत्यनिर्मितीचे काही अलौकीक सामर्थ्य आहे, असे त्याला वाटत होते. हे सामर्थ्य

पृथ्वीच्या ठिकाणीही असल्याचे त्याला दिसत होते. शिवाय, कृषीचा शोध ही स्त्रीनेच लावला होता. त्यामुळे त्या काळात पृथ्वीप्रमाणेच स्त्रीलाही माहात्म्य प्राप्त झाले होते. पुढे निर्मितीप्रक्रियेतील पुरूषाचे स्थान स्पष्ट झाल्यानंतर आणि नांगराची शेती सुरू झाल्यानंतर स्त्रीचे हे माहात्म्य कमी होऊन पुरूषप्रधानतेचे आगमन झाले. भारतात पुरूषप्रधान आर्यांचे आगमन झाल्यानंतर आर्यांमध्ये व येथील अनार्यांमध्ये अनेक संघर्ष, संकर झाले. यामध्ये आर्यांचा विजय झाला. अनार्यांबरोबर त्यांना काही तडजोडी कराव्या लागल्या. पराभूत अनार्यांनी आपली मातृसत्ताक पद्धती सोडून दिली नाही. एकीकडे जितके शक्य होईल तितके अंश जपण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तर दुसरीकडे त्याचप्रमाणात ते अंश दडपून टाकण्याचा आर्यांचा प्रयत्न होता. यामध्ये पुरूषप्रधानता अधिकाधिक स्थिरावत गेली आणि मातृसत्ताक पद्धतीचे काही अवशेष मात्र शिल्लक राहीले. एकेकाळच्या प्रभावी मातृसत्ताकाचे जे काही अवशेष उरले आहेत. याला अपवाद फक्त काही आदिवासी जमातींचाच आहे. थोडक्यात म्हणजे पुरूषप्रधान समाजव्यवस्था, स्थिरावण्यापूर्वी मातृसत्ताक पद्धतीचा अवलंब करणारी समाजव्यवस्था भारतातही होती. आणि स्वाभाविकपणे त्या व्यवस्थेमध्ये स्त्रियांना नंतरच्या काळापेक्षा अधिक स्वातंत्र्य होते.

भारताचा प्रचंड भौगोलीक विस्तार पाहता एकाच कालखंडातील परंतु वेगवेगळ्या प्रदेशातील शास्त्रकारांनी स्त्रीयांच्या बाबतीत वेगवेगळी भूमिका घेतल्याचे आढळते. विविध प्रदेशांत वेगवेगळ्या धर्मग्रंथांचा प्रभाव असल्याने मूल्यभेद होऊ शकतो. उदा. याज्ञवल्क्यस्मृतीवरील विज्ञानेश्वरीची (सु. 1070-1100) मिताक्षरी ही टीका बंगाल व पंजाबचा अपवाद वगळता भारताच्या सर्व प्रांतांतील न्यायालयातून निवाडे देताना आधार मानली जात होती. बंगालमध्ये जीमूतवाहनाच्या 'दायभाग' या ग्रंथांचा मोठा प्रभाव असल्यामुळे तेथे मात्र मिताक्षरेला मान्यता मिळाली नाही. या दायभाग नावाच्या ग्रंथानेच विधवांच्या वारसाहक्कांच्या बाबतीत अत्यंत उदार भूमिका घेतली होती. दक्षिणेमध्ये काशिनाथ उपाध्यायांचा

'धर्मसिंधू' (सु. 1890-91) हा ग्रंथ अधिक प्रमाणात मानला जात होता. वेगवेगळ्या संप्रदायांच्या स्त्री विषयक दृष्टीकोनातही फरक आढळतो. उदा. सन्यास व मोक्ष यांना असाधारण महत्त्व देणारे संप्रदाय स्त्रियांना मोक्षाच्या मार्गातील अडथळा, नरकाचे द्वार वगैरे म्हणून त्यांचा तिरस्कार करतात. याउलट, चार्वाकदर्शन, तंत्रमार्ग इ. संप्रदायांनी अशा स्त्रीनिंदेला विरोध केला आहे. काही वेळा ज्यांच्यावर विशिष्ट संप्रदायाची छाप स्पष्ट पणे दिसत नाही अशा काही व्यक्ती परंपरेपेक्षा वेगळी मते मांडताना दिसतात. उदा.- महाकवी बाणभट्ट सतीच्या चालीवर टिका करताना दिसतो. किंवा, वराहमिहीर हा स्त्रियांची बाजू हिरिरीने मांडताना दिसतो. एखाद्या संप्रदायाच्या अज्ञात प्रभावमुळे त्यांनी असे केल्याची शक्यता आहे. किंवा स्वत:च्या न्याय बुद्धीला पटल्यानेही हि भूमिका घेतली असेल.

**कालभेद :-**

देशभेदाहूनही कालभेद अधिक महत्त्वाचे आहेत. हिंदू समाजाच्या प्रदीर्घ इतिहासामध्ये कालपरत्वे अनेक बदल झालेले आहेत. हा बदल घडत असताना त्या काळातील शास्त्रकारांचा व अन्य समाजाचा स्त्रीविषयक दृष्टीकोणही बदलत आला आहे. आर्यांच्या आगमनापूर्वी येथे मातृसत्ताक पद्धत होती, याचा निर्देष यापूर्वी आला आहेच. त्यानंतरचा कालखंड (इ. स. पूर्व सुमारे 2500 ते 1000) हा वैदिक संहिता, ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे इत्यादींचा आहे. पुढचा कालखंड (इ. स. पू. सुमारे 800 ते 300) हा निरूक्त, श्रोतसूत्रे, गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, पाणिनीची अष्टाध्यायी इ. ग्रंथाचा आहे. इ. स. पूर्व सुमारे 300 ते इ. सन. 300 या काळात मनस्मृती याज्ञवल्क्यस्मृती, नारदस्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र, इ. ग्रंथ झाले आहेत. इ. सन 300 ते 900 या काळत इतर स्मृती व पुराणे तयार झाली आहेत. इ. सन 900 ते 1800 या काळात स्मृतींवरील टीका आणि धर्मनिबंध म्हटले जाणारे संकलनात्मक स्वरूपाचे ग्रंथ यांची निर्मिती झाली आहे.[4]

या सर्व कालखंडाचा आढावा घ्यायचा झाला तर तो इ. सन पूर्वच्या प्रारंभापासून स्त्रियांची कमालीची वाईट अवस्था झाल्याचे आढळते. वैदिक कालखंडापासून नजर टाकता त्या काळात स्त्रियांची स्थिति कितीतरी बरी होती. त्यांना जवळ जवळ सर्व क्षेत्रात वाव होता. पण जसजसे पुढील कालखंडाकडे दृष्टी जाते तसतसे धर्मशास्त्रीय ग्रंथ, समाज, शाळाकार यांचा दृष्टीकोण बदलत गेल्याचे जाणवते. मनुस्मृतीच्या काळापासून मात्र स्त्रीयांचा ऱ्हास व त्यांच्या विषयीचे दृष्टीकोणही पूर्णपणे संकुचित झालेले दिसून येते. स्त्रीयांच्या दृष्टीकोणातील हा बदल टप्प्याटप्प्याने पुढील प्रमाणे विशद केलेले आहे.

**प्रागैतिहासिक युग :-**

ज्ञात इतिहासाच्यापूर्वी प्रागैतिहासिक काळात काही विद्वानांच्या अनुमानानुसार तत्कालीन समाजामध्ये विवाह पद्धति नव्हती. स्त्री पुरूष सामाजिक समुहात छोट्या स्वरूपात रहात होते. यौन-संबंधात मनुष्य अर्धमानव, अर्धपशु प्रमाणे होता. तरीपण स्त्रियांची स्थिति पुरुषांबरोबर नव्हती. त्याहीपेक्षा श्रेष्ठ होती. कारण परिवार मातृसत्ताक होता. आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक जीवनात स्त्रीला विशेष अधिकार प्राप्त होते. परंतु आर्यांच्या भारतातील आगमनापूर्वीचे जे अवशेष मोहोंजोदडो आणि हड़प्पा इ. च्या उत्खननात मिळाले आहे, त्याच्या अभ्यासावरून त्या वेळच्या उच्च नागरिक सभ्यतेची कल्पना येते. त्या काळातील मूर्तींवरून देवत्वपदावर स्त्रीयांनाच सुशोभित केलेले दिसून येते. तत्कालीन संस्कृती निर्माण करण्यामध्ये स्त्रीयांचा प्रमुख हात असावा, असे कला-शिल्पच्या मिळालेल्या नमुन्यांवरून आणि घरांच्या विकसित व सुसंस्कृत स्तराच्या अवशेषांवरून दिसून येते.

**वैदिक युग :-**

आर्यांच्या संस्कृती प्रसारामध्ये स्त्रीयांचे योगदान कमी नव्हते. आर्यांचा सर्वात जुना ग्रंथ ऋग्वेद जो हिंदुत्वाचे मूळ मानले जाते, त्याच्यामध्ये अनेक उल्लेख आढळतात. ज्यावरून त्या वेळच्या

स्त्रियांची परिस्थिती लक्षात येऊ शकेल. त्यावेळचे सर्वोच्च शिक्षण (ब्रह्मज्ञान) प्राप्त करण्यासाठी स्त्रीयांवर कोणतेही बंधन नव्हते. वेद आणि शास्त्रामध्ये पारंगत होण्याशिवाय महाकाव्यांची रचनाही त्या करत होत्या. ऋग्वेदाचे अनेक सूत्र आणि मंत्र त्यावेळच्या लेखिका ऋषिका आणि ब्रह्मचारिणींकडूनही लिहीले गेले आहे. आजही आपल्या घरात पत्नी, बहीण, आई या शब्दांच्या वर 'लक्ष्मी' आणि 'देवी' शब्दांना अधिक श्रद्धेने मानले जाते. 'धनाची देवी लक्ष्मी, ज्ञानाची देवी सरस्वती आणि शक्तीची देवी दुर्गा यांचा काय अर्थ निघतो ? खरोखरच प्राचीन भारतीय स्त्रीया या सर्व शक्तींच्या अधिकारीणी राहील्या आहेत. म्हणून तर देवीच्या रूपात पूजल्या गेल्या. आणि प्रसिद्धी पावल्या. ऋग्वेदात सरस्वतीला वाक्‌शक्ती म्हटले गेले आहे. जे त्यावेळच्या स्त्रीयांच्या वक्तृत्वकला आणि विद्वत्ता यांचे द्योतक आहे. [5] वैदिक काळात स्त्रीचे उपनयन केले जात होते. उपनयन हा एक अत्यंत महत्त्वाचा संस्कार होता. विद्याजर्नाचा प्रारंभ करण्यासाठी गुरूच्या जवळ घेऊन जाणे, असा उपनयनचा अर्थ आहे. अथांग संस्कृत साहीत्याचे मंथन केले असता स्त्रियांच्या उपनयाविषयी वचने आढळतात. भारतात इसवीसनाच्या प्रारंभापर्यंत मुलींचे उपनयन नियमितपणे होत होते. ब्रह्मचर्य आणि शिक्षण मुलांइतकेच मुलींना आवश्यक आहे असे वैदिक काळात मानले जात होते. आर्यांची सांस्कृतिक परंपरा टिकविणे गरजेचे वाटल्याने स्त्रियांचे उपनयन अपरिहार्य आहे असे त्याकाळातील लोकांना वाटत होते. कारण, मुलींचे उपनयन झाले नाही तर त्या आपोआपच क्षूद्र ठरतील आणि मग शूद्र स्त्रीच्या ठिकाणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे द्विज निर्माण होऊ शकणार नाहीत, अशी भिती त्यांना वाटत होती. उपनयनानंतर मुली मुलांप्रमाणे व्रतपालन करीत असत वयाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षी लग्न ठरल्यानंतर अध्ययन थांबवण्याची त्यांना परवानगी होती.

ब्राह्मणग्रंथाच्या काळात म्हणजे इ. स. पू. 1500 ते 1000 या काळात वैदिक वाङ्मयाचा प्रचंड विस्तार झाला. शिवाय वैदिक मंत्राच्या उच्चारात किरकोळ चूक झाली, तरी त्याचे भीषण परिणाम

होतात अशी धारणा लोकांच्या मनात रूजली. त्यामुळे वेदाध्ययनासाठी 12 ते 16 वर्षे वेचली जावीत, असा आग्रह धरला जाऊ लागला. मुलींचे 16 ते 17 व्या वर्षी लग्न होत असल्यामुळे त्यांना 7 वा 8 वर्षेच अध्ययनासाठी मिळू शकत होती. एवढा काळ वेदाध्ययनासाठी पुरेसा नव्हता. स्वाभाविकच ब्राह्मणग्रंथांच्या काळात वैदिक पंडित असलेल्या स्त्रियांची संख्या कमी झाली. त्या अधिकाधिक दुर्मिळ होऊ लागल्या. इ. स. पू. 500 च्या सुमारास उपनयाननंतर गंभीरपणे वेदाध्ययनाला वाहून घेणाऱ्या थोड्याच ब्रह्मवादिनी स्त्रिया होत्या. बाकीच्या बहुसंख्य स्त्रियांच्या बाबतीत लग्नाआधी उपनयन कसे तरी उरकून घेतले जात होते.[6]

वैदिक काळात रणांगणात ही स्त्रीयांनी हिरीरीने भाग घेतलेले दिसून येते. ऋग्वेदाच्या अनुसार खेल राजाची मुलगी विश्पलाने चांगले सैनिक शिक्षण घेतले होते. वडीलांबरोबर युद्धक्षेत्रात आपला पराक्रम दाखवित असे. एकदा रणभूमीत आपला एक पाय गमवावा लागला होता. तर ऋग्वेदात इंद्रसेना नावाच्या रथी महीलेचा उल्लेख आहे. जीने बैले जोडलेल्या रथावर बसून शत्रूंना पराजीत केले होते. [7] अशा प्रकारच्या आढळणाऱ्या उदाहरणावरून वैदिक काळात स्त्रीयांचे स्थान समजून येते. वैदिक आर्यांचे भारतात आगमन झाल्यानंतरच्या कोणत्याही काळात विधवांच्या पुनर्विवाहाला प्रतिष्ठा नव्हती. हे कटू सत्य आहे. ऋग्वेदात विधवेच्या पुनर्विवाहाचा नि:संदिग्ध उल्लेख नाही. अथर्ववेदाच्या काळात अशा विवाहाला बंदी नसली तरी प्रतिष्ठाही नव्हती, हे दर्शविणारा एक पुरावा अथर्ववेदात आढळतो. पुनर्विवाह करणाऱ्या स्त्रीचा निर्देश अथर्ववेदाने पुनर्भू असा केला असून तिला व तिच्या द्वितीय पतीला एक प्रकारचे प्रायश्चित घ्यावयास सांगितले आहे. मूळ मंत्राचा अर्थ असा आहे की, ''स्त्रीचा आधी एक पतीशी विवाह झालेला असताना तिने पुन्हा दुसऱ्याशी विवाह केला, तर त्या दोघांनी भाताच्या पाच ताटांसह एक बोकड द्यावा, म्हणजे त्या दोघांचा वियोग होत नाही. जो द्वितीय पती बोकड, भाताची पाच ताटे आणि दक्षिणेचा प्रकाश देतो, तो पुनर्भू स्त्री सह एकाच लोकात राहतो.''[8]

सतीप्रथेचे समर्थन वा पुरस्कार करणारा कोणताही पुरावा वैदिक वाङ्मयात आढळत नाही. ऋग्वेदातील एका ऋचेमध्ये सतीचा अस्पष्ट निर्देश असला तरी त्या प्रथेला विरोध करणारा आहे. ऋग्वेदातील त्या ऋचेच्या अर्थाविषयी मतभेद असले तरी त्यामध्ये सती जाणाऱ्या स्त्रीला परावृत्त करण्याचा प्रयत्न आहे. [9] ऋग्वेदातील ती ऋचा अशी, ''हे नारी, उठ आणि जीव लोकात ये. तू या मृताजवळ झोपली आहेस. ये, तुझे पाणिग्रहण करणाऱ्या आणि तुझ्यावर प्रेम करणाऱ्या पतीचे हे पत्नीत्व समाप्त झाले आहे.''[10] अथर्ववेदात अशाच स्वरूपाचा एक मंत्र असून त्याचा आशय असा आहे, ''हे मर्त्या, ही पतिलोक वरणारी आणि पुराण (पुरातन, प्राचीन) धर्मांचे पालन करणारी नारी मृत अशा तुझ्याजवळ झोपली आहे. तिला इहलोकात संतती आणि द्रव्य दे. (सती जाण्याऐवजी नियोगाद्वारे संतती व द्रव्य मिळवू दे.)''[11] ऋग्वेद आणि अथर्ववेद यांमधील या दोन्ही मंत्राकडे पाहिले असता त्यापूर्वीच्या काळातील सती प्रथेची आठवण म्हणून मृत पुरूषाची पत्नी त्याच्या प्रेताजवळ झोपत असे. परंतु तिला इतर लोक उठवून परत आणत असत हे स्पष्ट होते. क्वचित एखादी स्त्री सती जातही असेल.[12] पण अशी घटना अपवाद स्वरूपात असू शकेल.

एकंदरीत वैदिक काळाकडे एक दृष्टीक्षेप टाकल्यास असे आढळून येते की, शिक्षण काळात मुली ब्रह्मचर्याचे पालन करीत असत. मुलां,मुलींना आपले जीवनसाथी निवडण्याचा पूर्ण अधिकार होता. ज्ञानाच्या पाठ-पठणासाठी ब्रह्मवादीनी स्त्रीयांना आजन्म कुमारी राहण्याची अनुमती होती. बालविवाह पद्धती नव्हती. ऋग्वेदामध्ये परिवार पितृसत्तात्मकच होते. आणि बहुपत्नीप्रथेचा उल्लेखही मिळतो. परंतु विधवेच्या पुनर्विवाहवर बंधने नव्हती. सामाजिक, धार्मिक सभेत ही स्त्रीयांचे स्थान प्रमुख होते.

वैदिक युगातील स्त्री धार्मिक जीवनात पतीची सहचारी होती. पतीपत्नी दोहांसाठी प्रचलीत 'दाम्पत्य' शब्दावरून हे सिद्ध होते की परिवारातील सर्व कार्य आणि निर्णयात समान अधिकार होता. स्त्रीया

वैदिक शिक्षणाबरोबरच यज्ञयाग संपादित करू शकत होत्या. वेदांमध्ये अनेक ठिकाणी लोपामुद्रा, रोमसा, घोषा, सूर्या, अपाला, विलोमी, सावित्री, यमी, विश्वम्भरा, श्रद्धा, कामायनी, देवयानी इ. नावे मिळतात. ज्यांना विद्वतेच्या आधारावर ऋषिका आणि ब्राह्मणी संबोधले गेले आहे. या उच्चशिक्षित कन्यांसाठी त्यांच्या योग्यतेच्या वरसंशोधनाचे उल्लेखही आढळून येतात. आणि त्यांसाठी स्वयंवर प्रथाही होती.

**उत्तरवैदिक वा ब्राह्मण काल :-**

या काळातही उच्च जातीत स्त्रियांचे पुरूषांबरोबरीने 'उपनयन संस्कार' केले जात होते. त्यांना अध्यात्मिक ज्ञान आणि दर्शनशास्त्राचे शिक्षण देणे अनिवार्य होते. ब्राह्मणग्रंथामध्येही 'स्त्री ही ब्रह्मा बभूविव' म्हणजेच त्यांना ब्रह्मा असे म्हटले गेले आहे परंतु शिक्षण ग्रहण करण्यासाठी त्यांना गुरुकुलात न पाठविता योग्य नातेवाईकांच्या घरी पाठविले जात असे. धार्मिक कार्य करण्यासाठी केवळ शिक्षित स्त्रीयांनाच योग्य मानले जात होते. [13] सती प्रथेविषयी ब्राह्मणग्रंथात व गृह्मसूत्रांतून काहीही माहीती नाही.[14] ब्राह्मणग्रंथ काळात अध्ययनासाठी पुरेसा अवधी मिळत नसल्याने वैदिक पंक्तीत स्त्रीयांची संख्या कमी आढळते. यावरून असे दिसते की वैदिक काळातील असलेले स्त्रीयांचे स्थान ब्राह्मणकाळात संकुचित झालेले दिसते. उपनिषदे काळातही स्त्रियांचे उपनयन संस्कार हे चालू ठेवलेले आढळते. गार्गी, मैत्रेयी यांच्या कथा बृहदारण्यक उपनिषदात झाल्या आहेत. आपण प्रथम मैत्रेयीच्या कथेचा (बृह. उप. 2.4, 4.5) विचार करू. याज्ञवल्क्याला मैत्रेयी व कात्यायनी अशा दोन बायका होत्या. त्यापैकी मैत्रेयी ही ब्रह्मवादिनी आणि कात्यायनी ही स्त्रीप्रज्ञा होती.एकदा याज्ञवल्क्य मैत्रेयीला म्हणाला, ''हे मैत्रेयी, मी सन्यास घेत आहे तेव्हा तुमच्या दोघींमध्ये संपत्तीची वाटणी करतो.'' त्यावर मैत्रेयीने उत्तर दिले, 'वित्ताने मला अमरत्व मिळेल काय ? तेव्हा तुम्ही मला तुमच्याजवळचे ज्ञान द्या. यावर यज्ञवल्क्याने तिला आत्म्याचे ज्ञान दिले. विवेचनाच्या ओघात तो एकदा म्हणाला, ''आत्मा महाभूतांतून जन्माला येऊन त्यातच विलीन होतो.

मृत्युनंतर जाणिव शिल्लक रहात नाही.'' तेव्हा मैत्रेयीने हे आपणास समजत नसल्याचे सांगितले. तेंव्हा याज्ञ-वल्क्य म्हणाला, ''मैत्रेयी, तुला आत्म्याचे स्वरूप समजावून सांगितले आहे. हेच अमरत्व आहे.'' असे म्हणून तो निघून गेला. यावरुन मैत्रेयी ब्रह्मवादीनी असली तरी तिची जिज्ञासू विद्यार्थिनी म्हणूनच प्रतिमा उभा राहते.

गार्गी व मैत्रेयि या समकालीन आहेत. विद्येच्या क्षेत्रात गार्गी ही मैत्रेयी पेक्षा पुढे गेलेली आहे. कारण ती, आत्मविद्येच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या तत्कालीन पुरुषांच्या तोडीस तोड आहे. उपनिषदात आलेली तिची कथा अशी, (बृह. उप-3) वाचक्नवी म्हणजेच वाचक्नूची कन्या गार्गी हीने याज्ञवल्क्यावर प्रश्नांचा भडीमार केला. उत्तराच्या अखेरीस तो म्हणाला, ''गार्गी मर्यादेचे उल्लंघन करणारे प्रश्न विचारू नयेत, नाहीतर तुझे मस्तक गळून पडेल. ज्या देवतेविषयी प्रश्न विचारू नयेत अशा देवतेविषयीचे प्रश्न विचारत आहेस, हे गार्गी असे प्रश्न विचारू नकोस.'' याज्ञवल्क्याला प्रश्न विचारायचे धाडस कोणी केले नाही. गार्गीच्या आधी याज्ञवल्क्याने कोणालाही धमकावले नव्हते. एका स्त्रीने प्रश्नांचा भडीमार करणे सहन न झाल्याने त्यांच्या मनाचा तोल गेल्याची शक्यता आहे. गार्गीनेही परिणामांची फिकीर न करता पुन्हा प्रश्न विचारण्याचा निर्णय घेतला. गार्गीने नम्र पणे दुसरा प्रश्न झेलण्यास आव्हान केले. त्याचेही उत्तर समाधान कारक मिळाल्यावर तिने ब्राह्मणांना ब्रह्मविषयी वादात कोणी याज्ञवल्क्याला जिंकू शकणार नाही असे सांगितले. ज्ञानी असूनही आपणाशी असभ्यपणाने वागला तरी विद्वान आहे असे जाणून उमदेपणाने याज्ञ वल्क्याला सर्वश्रेष्ठ ब्रह्मज्ञानी म्हणून घोषित करणारी गार्गी खरोखरीच ब्रह्मवादी विदुषीच होय. [15]

यावरून असे स्पष्ट होते की, धर्म आणि समाजात स्त्रीयांना पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होते. राजऋषी किंवा तत्कालीन दार्शनिक सभेमध्ये जेंव्हा विभिन्न विचारातील लोक एकत्र येऊन दार्शनिक व अध्यात्मिक चर्चा आणि विवादात भाग घेत होते त्यांमध्ये महिलाही सफलतापूर्वक सहभागी होत होत्या.

उच्च स्तराच्या या चर्चेमध्ये उद्दालिका, आर्तभागा, विदग्धा, अश्वला, गार्गी, मैत्रेयी इ. व्यासंगींचा भाग घेण्याचा अर्थ असा की, उपनिषद काळातही स्त्रिया उच्चशिक्षणाने विभूषित होत्या.

या काळामध्ये पुरूष राज्ये जिंकण्यास गेले किंवा एकराज्य करण्यात गुंतले तर स्त्रीया शेतीची कामे, कपडे, धनुष्य बाण इ. करण्याबरोबरच घरगृहस्थी देखभाल करण्यात वेळ घालवत असत. बालविवाहाची प्रथा नव्हती. आणि हवा तसा पती निवडण्यास स्वातंत्र्य होते. बौद्धिक क्षेत्रात स्त्रीया या पुरूषांपेक्षा कमी नव्हत्या. तरीही हळूहळू वर्णव्यवस्थेच्या नियमांच्या आगमना बरोबरच स्त्रीयांच्या पदामध्ये क्रमाने ऱ्हास होऊ लागला. नंतर बहुपत्नी प्रथा आणि विवाह प्रथा कारणाने स्त्रीचा दर्जा आणखी खालावला. आर्यांच्या दक्षिण विजयाबरोबरच प्रथाही प्रचलित झाल्या. इथूनच म्हणजे उत्तर वैदिक काळापासून भारतीय स्त्री चा दर्जा खालावण्यास प्रारंभ झाला असे मानले तर ते अयोग्य ठरणार नाही.

**महाकाव्यांचा काळ :-**

रामायण आणि महाभारतामध्ये स्त्रीयांचे वर्णन विदुषीयांच्या रूपात कमी आणि तप, त्याग, नम्रता, पतिसेवा इ. गुणांनी विभूषित गृहस्वामिनीच्या रूपात अधिक आढळते. तथापि, पुढे गेल्यावर बौद्धकाळात भिक्षुणीद्वारा ज्ञानार्जन झाले. भिक्षुणी कडून गृहबंधनापासून अलग होणे, व्यक्तीत्वाचा स्वतंत्र विकास हे बौद्धकालीन स्त्री स्वातंत्र्याची झलक दर्शविते. हे निश्चित आहे की उत्तरवैदिक काळात व त्याच्यानंतर रामायण, महाभारत या काळात स्त्रीयांचे अधिकार पूर्वीप्रमाणे राहीले नाही. विवाहाचे वय कमी झाले. बहुपत्नी प्रथा वाढली. विधवा विवाहावर बंधने लादण्यास सुरूवात झाली. विवाह प्रत्येक मुलीसाठी अनिवार्य मानले जाऊ लागले.स्त्रियांचा प्रमुख गुण व कर्तव्य पतिसेवा व आज्ञापालन हे झाले. [16] वाल्मीकी -रामायणाच्या उत्तरकांडामध्ये कवीने सतीप्रथेची घटना स्पष्ट सांगितली आहे. कुशध्वज नावाच्या एका ब्रह्मर्षिची शंभू नावाच्या दैत्याने हत्या केली. त्यानंतर कुशध्वजाच्या पत्नीने पतीच्या शरीराला मिठी मारून

अग्नीमध्ये प्रवेश केला, असे तिची मुलगी वेदवती हिने रावणाला सांगितले होते. [17]

महाभारतात आलेले सतीचे निर्देश मात्र कोड्यात टाकणारे आहेत. पांडूची पत्नी माद्री सती गेली. वसुदेवाच्या देवकी वगैरे चार स्त्रिया सती गेल्या. तसेच, कृष्णाच्या रूक्मिणी वगैरे पाच स्त्रीयांनी अनुगमन केले. महाभारतातील या घटना ऐतिहासिक आहेत की नाही, हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. इ. स. पूर्व 3 ऱ्या शतकात रचल्या गेल्या असतील, तर त्या आधीच्या काळात भारतात सतीप्रथा नव्हती. या मतास बाधा येत नाही. परंतु या घटना ऐतिहासिक असतील तर त्यांचा काळ कितीतरी मागे न्यावा लागेल. आणि प्राचीन काळीही भारतात सतीची प्रथा होती असे मानावे लागेल. [18] रामायणात म्हटलेले आहे, ''या जगात कुलस्त्रियांच्या दृष्टीने वैधव्यासारखे दुसरे कोणतेही भय नाही.''[19] रामायणाचे हे वचन वास्तवतेचे दर्शन घडविते. त्याकाळात पुरूषप्रधान समाजामध्ये विधवा स्त्रियांची स्थिति किती दुय्यम व दयनीय होती हेच सांगते. महाकाव्यकाळात महाभारताच्या काळात पांडवांकडून आपली पत्नी द्रौपदी जुगाराच्या डावावर लावणे आणिं रामायणकाळात एका धोबीकडून संशय व्यक्त होण्याने रामासारख्या महापुरूषाने आपल्या पत्नीलां (सीतेला) वनवासाला पाठविणे हे पत्नीवर पतीचा मनमानी अधिकार गाजवण्यास पुष्टी देणारा आहे.

अनुलोम विवाहाने प्राप्त झालेल्या अनार्य पत्नी संस्कृत भाषेच्या ज्ञानाच्या अभावी धार्मिक कार्यात भाग घेण्यास असमर्थ ठरली. त्यांना धार्मिक प्रथेत अयोग्य असे घोषित केले. अनेक विवाहाची प्रथा प्रचलीत झाली. अशा तऱ्हेने विलासी समाजात स्त्री फक्त उपभोगी वस्तू मानली गेली. वैदिक काळात सरळ कर्मकांडाचे अध्ययन स्त्रीया 16-17 वर्षापर्यंत करत होत्या. तर 18-20 वर्षापर्यंत सामान्य मुलींची लग्ने केली जात होती. परंतु या युगामध्ये कर्मकांड संबंधी इतके विस्तृत झाले की त्याचे अध्ययन करणे तेंव्हाच शक्य होते. जेव्हा स्त्री 22-24 वर्षापर्यंत अविवाहीत राही. शेवटी तिला शिक्षणापासून वंचित ठेवून लहान

वयातच विवाहयोग्य समजले जाऊ लागले. शिक्षणाच्या अभावामुळे स्त्रीचे धार्मिक तसेच सामाजिक स्थान क्रमाने खाली होत गेले. पुढे तर उपनयन संस्कारची अवस्था हिच विवाहाची अवस्था समजली जाऊ लागली. विवाहात मुलीच्या संमतीलाही कोणताच अर्थ राहीला नाही. विधवा विवाहाचा निषेध होऊ लागला. नैतिकतेचे मापदंड हळूहळू बदलायला लागले. पतिव्रता धर्मच सर्वोच्च धर्म आणि स्वर्गप्राप्तीचे साधन समजले जाऊ लागले. याचाच परिणाम कालांतराने सतीच्या प्रथेच्या रूपाने पुढे आले असणार. लगभग इ. स. पूर्व 300 पर्यंत स्त्रीयांचा पतीच्या संपत्तीवर कोणताच अधिकार नव्हता.

**स्मृती काळ :-**

स्मृती काळात येऊन स्त्रीच्या दर्जेत आणखी कमीपणा आला. ती केवळ आईच्या रूपात आदरास पात्र ठरली. एक स्त्री, पत्नी, प्रेयसी म्हणून तिची काहीच प्रतिष्ठा राहीली नाही.[20] पती, पत्नी यातील परस्परसंबंधाबद्दल बोलताना मनू म्हणतो, ''मरेपर्यंत एकमेकांशी एकनिष्ठ राहाणं हा पती आणि पत्नी या दोहोंसाठी सर्वोत्तम धर्म आहे. पवित्र विवाह बंधनाने एकत्र आल्यानंतर परस्परात मतभेद होणार नाही वा हातून अयोग्य काम होणार नाही यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न करावा. आणि दोघांनीही एकमेकाशी एकनिष्ठ रहावं. ''[21] ज्या घरात पत्नीच्या मायेमुळे पती सुखी होतो आणि पतीच्या मायेमुळे पत्नी सुखी होते, त्या घराची भरभराट होते. [22] पत्नीच्या शुद्ध चारित्र्यामुळे संतती शुद्ध निपजते आणि कुल, धर्म, स्वत: गृहस्थ आणि स्वधर्म यांचे पावित्र्य राखले जात. [23] असे जरी असले तरी मनुस्मृतीच्या काळापासूनच स्त्रीयांच्या अधोगतीचे पर्व सुरू झाल्याचे दिसते. मनूला स्त्रीनातीबद्दल जरी जिव्हाळा, आदर असला तरी ते जास्त काळ टिकत नाही. त्याचे स्त्रीयांविषयीचे कायदे आणि आज्ञा पाहिले की त्याचा स्त्रीदृष्टीकोण काय आहे हे समजून येते. स्त्रीयांच्या स्वभावाविषयी टिप्पणी करताना मनू म्हणते की, पुरुषाला वाममार्गाला लावणे स्त्रीचा स्वभाव आहे. आडाणी पुरूषालाच नव्हे तर विद्वान पुरूषाला देखील

मोहित करून त्याला बिघडविण्यांच सामर्थ्य स्त्रीमध्ये असते आणि म्हणूनच आई, बहिण किंवा कन्या कोणीही असोत, पुरूषानं त्यांच्याशी एकांतात बसू नये. [24] मनु म्हणतो : अगदी तिच्या स्वत:च्या घरात देखील मुलीन, तरूण स्त्रीन किंवा म्हातारीन स्वईच्छेने काहीही करू नये. बाल्यावस्थेत तिन पित्याच्या छत्राखाली, तरूणपणी पतीच्या छत्राखाली आणि वृद्धापकाळी पुत्राच्या छत्राखाली रहाव. स्वतंत्र वृत्तीन कधीही राहू नये. पती अवगुणी, दुराचारी आणि कामांध होऊन दुसऱ्या स्त्रीच्या नादी लागला तरी पतीव्रता स्त्रीन त्याची मनोभावे सेवा करावी.[25] स्त्री शिक्षण ही मनूला मान्य नाही मुलीला उपनयन संस्काराची गरज नाही. पतीगृही त्याची सेवा करणे म्हणजे गुरूची सेवा करण्याप्रमाणे आहे.[26] स्त्रीने घरकामाकडे लक्ष द्यावे, घरातील सर्व कामे करावीत काटकसरीने संसार करावा पण हे सर्व करताना नेहमी प्रसन्न असावे.[27] मनूला विधवा पुनर्विवाह मान्य नाही. मात्र कौमार्य भंग न झालेल्या विधवेच्या विवाहाला परवानगी देतो. तो म्हणतो मुलीचे वाग्दान झाल्यानंतर पती मृत्यु पावला तर अशा कुमारिकेशी तिच्या दिराने विवाह करावा.[28] विधवेने फळ, कंदमुळे खाऊन आपले शरीर कृश करावे, विकारांना काबूत ठेवावे व परपुरूषाचे नाव उच्चारु नये. जी स्त्री नवऱ्याच्या मृत्युनंतर देखील पतिव्रताच राहते ती स्वर्गात जाते. [29]

अशा प्रकारचे विचार मनुने मांडलेले आहेत. स्त्रीयांच्या स्वातंत्र्याला व अधिकाराला पूर्णपणे मर्यादा घातलेल्या आहेत. धर्मशास्त्रांच्या मतमतांतरामध्ये अपवादात्मकपणे एक सुखद असा आशेचा किरण दाखविणारा श्लोक आढळतो. 'नारदस्मृती, पराशरस्मृती आणि अग्निपुराण' या तिन्ही ग्रंथात आढळतो. तो म्हणजे, ''पती हरवला असेल, मरण पावला असेल, सन्यासी झाला असेल, नपुंसक असेल आणि पतित झाला असेल, तर या पाच संकटांच्या प्रसंगी स्त्रीयांनी दुसरा पती करणे शास्त्रविहीत आहे. असे असले तरी नारदस्मृतीने स्वत: 'कन्या एकदाच दिली जाते' असे विधान करून आपल्याच मताला छेद दिला आहे. नपुंसक पतीचा त्याग करून दुसरा पती करावा असे एकापेक्षा अधिक वेळा म्हटले

असून तसे करणे हे प्रजापतीचे कार्य आहे. असेही म्हटले आहे.[30] मनुस्मृती, कौटिल्य, याज्ञवल्क्यस्मृती इ. स्मृती काळात एकीकडे स्त्री जीवनाविषयी दयाभाव दाखवित असल्याचे दिसत असले तरी त्याकाळापासून बंधने लादून तिला पूर्णपणे सर्वमार्गाने जखडून टाकले.

तिच्या विवाहाचे वय ही हळूहळू कमी होत गेले आणि लग्नाचे योग्य वय आठ-नऊ वर्ष मानले जाऊ लागले. यामुळे शिक्षणही नाममात्र राहीले. स्मृतीकारांनी स्त्रीच्या सर्व अधिकारांचे अपहरण केले. मनूने एकीकडे असे लिहीले आहे की ज्या घरात स्त्रीचा जन्म होतो तेथे देवता निवास करतात. आणि दुसरीकडे तिला जन्मापासून मृत्युपर्यंत पुरूषांच्या आश्रयाखाली ठेवले आणि आचारसंहितेच्या रूपाने अनेक बंधनात जखडून टाकले. खरेतर लक्षात घेण्यासारखे हे आहे की अशिक्षित, बाल विवाह इ. बंधन उत्तर व मध्यभारतामध्ये शक, हूण इ. विदेशी आक्रमणानंतरच, स्त्री संरक्षणाच्या दृष्टीने लादले गेले आहे.

**मध्ययुग :-**

मध्ययुगात विशेषकरून भारतावर मुसलमानांचे आक्रमण आणि मुघलांच्या राज्यानंतर, भारतात स्त्रीयांच्या दर्जात आणखीन कमीपणा येत गेला. ब्राह्मणांनी रक्तशुद्धी, स्त्री सतीत्वाची रक्षा, आणि हिंदू धर्माच्या नावाखाली तीला इतक्या अधिक सामाजिक बंधनांनी जखडून टाकले की तिच्या अस्तित्वाचे नामोनिशाणही राहीले नाही. मुलींचे शिक्षण एकदम बंद झाले. मुस्लीम आक्रमणाच्या दरम्यान मुलींना पळविण्याच्या घटना वाढल्या तेव्हा हिंदूच्या मध्ये लहान लहन मुलींचे लग्न केले जाऊ लागले. पडदा प्रथेलाही प्रारंभ झाला.

मुलगी जरा कळती झाल्यावर तिचे घरातून बाहेर पडणे बंद झाले. सासरच्या लोकांपासूनही पडदा. स्त्री जीवन चार भिंतीच्या आत सीमित झाले. सती प्रथा कळस होण्यापर्यंत पोहोचला. विधवा विवाह खालच्या जातीशिवाय मध्यम व उच्च वर्गातही वाईट मानले जाऊ लागले. स्त्रीयांचे सर्व

अधिकार हिरावले गेले. स्वतंत्रता नावापुरती राहीली. हे दमनचक्र 10 व्या शतकात भारतावरील विदेशी आक्रमणाबरोबरच सुरू झाले आणि 16 व्या शतकात मुघलांच्या भारतातील आगमनानंतरही गतिशील राहिले.

विदेशी आक्रमणाचा प्रभाव उत्तर भारतात अधिक होता. मात्र दक्षिण भारतीय जीवनात स्थिरता होती. त्यामुळे बालविवाह, परदा प्रथा, सतीची चाल या सारख्या गोष्टी तेथे रुजल्या नाही. दक्षिणेमध्ये मधल्या काळात स्थानिक भाषा आणि संस्कृत भाषेमध्ये अनेक कवयित्री आणि लेखिकांचे नावे आढळून येतात.[31] मध्ययुगात अशा प्रकारची स्थिति असतानाच हळूहळू विधवेच्या केशवपनाची प्रथा सुरू होऊन गेली. तिला विद्रुप करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न झाला. अशा प्रकारची मध्ययुगीन काळात स्त्रीयांची स्थिती होती. हळूहळू ती जास्तच विकृत बनत गेल्याचे जाणवू लागले. स्त्रीयांना आणि शूद्रांना एकाच मापदंडाने तोलण्यात आले. मध्ययुगात होणाऱ्या बदलाने स्त्रीला पुरते जायबंद केलेले दिसते. विदेशी आक्रमणापासून वाचविणे हे कारण पुढे करून पूर्ण स्त्रीयांची गळचेपी करण्याचा प्रयत्न झाला असे वाटू लागले. या सर्व घटनेमुळे स्त्री ही कमकुवत बनत चालली. तिला स्वत:बद्दल आत्मविश्वास राहिला नाही. तिला नव्याने उभारण्यासाठी आधाराची गरज वाटू लागली. पूर्वी कधी नव्हती इतकी वाईट स्थिति स्त्रियांची झाली आणि हळूहळू ती वाढतच गेली. समाजातील सर्व जात वर्गातील, स्तरातील रूढी, परंपरा म्हणून टिकून राहीली. अशा प्रकारची दयनीय अवस्था मध्ययुगातील स्त्रीची झाली होती.

## ऐतिहासिक काळ :-

ऐतिहासिक काळ अलिकडचा, जवळचाच. त्या काळातील राजघराण्यांविषयी माहीती उपलब्ध आहे. त्याकाळी उपलब्ध असलेल्या माहितीवरून लक्षात येते की राज्य करण्यासाठी प्रथम वारसा हा मुलाकडेच जाई. पर्यायाने पुरूषाकडेच जात असे. पण काही वेळेला मुलगा नाही म्हणून किंवा लहान

म्हणून त्याची पालनकर्ती आई राजकारणात रस घेत असे. त्या काळातही रूढी, प्रथा परंपरेचे जाळे असले तरी बऱ्याच विरांगना होऊन गेल्या आहेत. स्वराज्य स्थापणाऱ्या शिवाजीराजांची आई जिजाबाई याच मूळ प्रेरणा स्थान होते. लहानपणापासून त्यांच्या मनावर तसे संस्कार घडवून आणिले. जिजामातेने शिवाजीचे शिक्षण करण्यात, राष्ट्रधर्माची जाणिव त्याला देण्यात व पराक्रमाची स्फूर्ती देण्यात फार मोठा वाटा उचलला. त्याकाळातही स्रीयांनी म्हणजेच ताराबाई, अहिल्याबाई यांनी प्रत्यक्ष राज्यकारभार केला. अहिल्याबाईंनी प्रजेच्या हिताची दक्षता घेऊन पुष्कळ कामे केली. चांदबीबी व झाशीची राणी लक्ष्मी यांनी प्रत्यक्ष रणांगणांवर शौर्य गाजविले. या उदा. वरून असे म्हणण्यास हरकत नाही की संधी मिळाली तेव्हा स्रियांनी राजकारणात कर्तबगारी दाखविली. असे असले तरी 'घ' चा 'मा' करणारी एखादी आनंदीबाईही त्यात निपजली.

इतिहासकालीन राजघराण्यातील या गोष्टी असल्या तरी त्या काळातील सामान्य लोकांच्या जीवनाची चित्रे त्यात दिसत नाही. परंतु एकंदर समाजाच्या बदलत्या अवस्थेबरोबरच सामान्यांची परिस्थिती बदलत गेली.

**अंधार युग :-**

स्रीची होत जाणारी अवनती इतक्या पराकोटीला पोचली की स्री मनाने, बुद्धीने, शरीराने, विचाराने पूर्णपणे पुरुषांची दासी बनली. आपण दुर्बल आहोत. असे ती स्वत:स मानू लागली. पुरूषही तिला अबला समजू लागला. युद्धामुळे स्री ही रक्षणाची वस्तू बनली. अर्थसत्तेचे प्राबल्य जसजसे वाढत गेले तसतसे अर्थार्जन करणारा पुरूष हा अधिकाधिक वर्चस्व गाजवू लागला. स्री ही त्याच्या अंकीत कनिष्ठ अशी घटक बनली. कुटुंबात ती पाल्य व पुरूष पालक बनला. आणि समाजात तर जणू तिला काही स्थानच उरले नाही. शिक्षण, व्यवसाय या गोष्टींशी तिचा संबंध राहिला नाही, अर्थात त्याही काळी गरीब

शेतकरी घरातील स्त्री शेतावर राबतच होती, पण तीला आर्थिक स्वतंत्र घटक म्हणून कोणी मानत नसे. घरच्याच शेतीवर राबणाऱ्या स्त्रीला त्यात मजुरीही मिळत नसे. व जमिनीची मालकी अधिकारही स्त्रीला नव्हता. 'अर्थोऽहि कन्या परकीय एव' कन्या ही मुली दुसऱ्या घरी जाणार त्यामुळे माहेरच्या घरचा वंश ती वाढवितच नाही. सासरचा वंश ती वाढवते. पण ती अमुक एका पुरूषाची पत्नी म्हणूनच. तेथे असते अशी समजूत. त्यामुळे तिथेही तिला मालमत्तेत काहीही वाटा नव्हता. फक्त लग्नात तिला खास मिळालेल्या स्त्रीधनावर तिचा अधिकार होता.

बालविवाह रूढ झाले तेंव्हापासून मुलीचे शिक्षण बंदच झाले. वयात येण्यापूर्वी तिचे लग्न होई. कित्येकदा पाळण्यालाच बाशिंग बांधले जात असत. सासरी गेल्यावर कधी ती कौतुकाचा विषय बने तर कधी तिला सासुरवास सुरू होई. सामान्यत: दुसऱ्या घरातून आलेली आणि सून, म्हणून सासू तिला छळत असे. स्त्रियांनी निर्माण केलेल्या लोकगीतातून विशेषत: ओव्यांमधून उदा. ''सासुरवास जरी सोसावा कशासाठी ?'' आई-बापाच्या नावासाठी'' बालवयात लग्न होऊन सासरी गेलेल्या मुलीच्या मनातील भावना व तिचे अनुभव हे शब्दातून व्यक्त झालेले आहेत. लग्न म्हणजे काय याची कल्पनाही नसलेल्या मुलीला लग्नातील सोहाळे आटोपून ती सासरी गेली म्हणजे बावरून जात असे. पती हाच देव, सासुसासरे हेही देवासमान असे तिला शिकवले जाई, पण तिचा छळ सुरू झाला म्हणजे मूक अश्रु ढाळण्यापलीकडे तिच्या हातात काहीच नसे. त्यामुळे ओवी या त्या काळातील मुलींच्या भावनांचे प्रतिक बनते.

कित्येकदा तर ही 'चिरडी नेसून आलेली मुलगी तिरडीवरूनच घराबाहरे पडे.' असे वर्णन केले जाते. लहान वयात मुलीला पदराशिवाय साडी नेसवीत. तिला चिरडी म्हणत. सुनेचे डोहाळे वगैरेचे कौतुकही होत असे. पण या साऱ्या कौतुकाच्या मुळाशी ती आमक्या पुरूषाची पत्नी, होणाऱ्या बाळाची आई हिच भूमिका होती. स्वतंत्रपणे मुलीला काही स्थान नव्हते. म्हणूनच स्त्रीचे सारे 'सौभाग्य' हे

तिच्या पतीच्या ऐश्वर्यावर अवलंबून असे. पती मृत झाला किंवा पतीने तिचा त्याग केला म्हणजे तिचे सारे भाग्यच कोसळे. तिला कुटुंबात आणि समाजातही अगदी क्षुद्र गणले जाई.

स्त्रीच्या दास्यत्वाचा त्या काळातील कळस म्हणजे विधवा स्त्रीचे केशवपनाची ब्राह्मण समाजात असलेली दुष्ट चाल होय. विधवा झालेल्या स्त्रीने चांगली वस्त्रे, अलंकार हे काहीही घालू नये. थोडक्यात काय तर कोणताच शृंगार तिने करू नये, सणा-समारंभात मिरवू नये, धर्मकृत्यात भाग घेऊ नये. या सर्व रूढी तर सुरू झाल्याच पण याशिवाय सुंदर स्त्री असेल तर ती कोणत्याही पुरूषाला मोह पाडेल. म्हणूनच की काय तिचे केशवपन करण्याची दुष्ट रूढी श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण वर्गात प्रचलीत होती म्हणजे विधवा स्त्रीला शक्य तो विद्रुप करण्याचीच ही क्रुर चाल म्हणायची विधवा मुलगी ही अश्रितासारखी व मोलाने ठेवलेल्या स्त्रीसारखी काबाडकष्ट करून दिवस कुंठत असे.

हिंदू स्त्रियांमधील केशवपनाची चाल जितकी क्रूर तितकीच मुसलमान समाजातील बुरख्याची चालही माणुसकीला सोडूनच आहे. बुरख्याच्या आत तोंड लपवून वावरणाऱ्या स्त्रीला तर शुद्ध हवा ही मिळत नसे. ह्या काळात भारताच्या काही भागात सतीची चाल ही रूढ होती. हि पद्धत बंगालमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रचलीत होती. एकत्र कुटुंबपद्धती असताना एक मुलना निधन पावला तर त्याच्या पत्नीची घरातील किंमत एकदम कमी होत असे. मग तिला वारसा मिळणेही इतरांना पसंत नसे. त्यातूनही या दुष्ट रूढीचा जन्म झाला असावा. मुलगी विधवा झाली तर कित्येकदा तिला सक्तीने चितेकडे नेले जाई. महाराष्ट्रातही सतीची चाल अगदीच नव्हती असे नाही. माधवराव पेशव्यांच्या पत्नी रमाबाई ह्या स्वखुषीने सती गेल्या होत्या. अहिल्याबाई होळकर यांची कन्या मुक्ताबाई ही देखील दोन लहान मुले असताना पतीबरोबर सती गेली. म्हणजे सती जाण्याची प्रत्यक्ष सक्ती काही ठिकाणी होई तर काही सुसंस्कृत धार्मिक वृत्तीच्या स्त्रियांच्या मनात 'सती जाणे हा स्त्रीचा धर्म' ही भावना इतकी ठासली होती की, त्याचे नकळत

दडपण पापभिरू मनावर कसे पडत असे हेच हि उदाहरणे दाखवितात.

एकूण त्या वेळचा हिंदूचा कायदा किंवा पारंपारिक रूढी ह्या पुरूषाला न्यायाचे एक माप लावीत तर स्त्रीला दुसरे. पुरूषाला वारसा अधिकार आपोआप चालत येई तर स्त्रीला तो मुळीच नसे किंवा असलाच तर फार दुरान्वये व अतिशय अल्प. वारसा नसेल तर दत्तक घेण्याचा अधिकार पुरूषास होता. स्त्रीला अधिकार होता तो पतीच्या संमतीने पतीला वारसा पाहिजे म्हणून. तिला स्वतंत्रपणे हा अधिकार नव्हता. एकावेळी अनेक पत्नी असणे हे सर्रास सर्वत्रच दिसून येई. राज्यघराण्यातील पुरूषांचे जनानखाने असत. पण स्त्रीला मात्र एकच पती करण्याचा अधिकार, श्रेष्ठ असणाऱ्या वर्गातून पती निधन पावला तर पुनर्विवाहाचा अधिकार ही रूढीने दिला नव्हता. कष्टकरी समाज मात्र अधिक व्यवहारी होता. त्यांच्यामध्ये विधवा स्त्री दुसरा पती करू शकत असे. पण त्या लग्नाला पाट लावणे असे म्हणत. अशा स्त्रीला लग्नाच्या बायकोप्रमाणे मान मिळत नसे. धर्मकारणातही तिला गौण लेखले जाई. त्याकाळी घटस्फोटाचा कायदा नव्हता, कारण लग्न हा एक 'संस्कार' मानला जाई. यासर्व रूढी मुळे निर्माण झालेली दुसरी समस्या म्हणजे जरठकुमारी विवाहांची प्रौढ किंवा वृद्धपकाळात पत्नी वारली तर त्या पुरूषाला पुन्हा लग्न करावेसे वाटले तर त्याला प्रतिष्ठीत समजल्या गेलेल्या समाजात एखाद्या लग्न लांबलेल्या चौदा पंधरा वर्षाच्या किंवा त्याहूनही लहान मुलीशी लग्न करावे लागे कारण विधवेशी लग्न करण्यास शास्त्र आड येत असे. कित्येकदा शास्त्र बरोबर काय सांगते हे समजत नसे.

असा हा स्त्रीला अंधारात लोटणारा काळ लहान नव्हता. सतरा-अठरा शतके अशा प्रकारच्या कमी अधिक दास्यत्वाच्या परिस्थितीत स्त्री वावरत होती. चार भिंतींच्या आत तिचे विश्व कोंडले होते. पण प्रतिभा, प्रज्ञा या अशा भिंतीची बंधने मानीत नाही, शिक्षणाची साथ ही प्रतिभेला लागतेच असेही नाही. म्हणूनच की काय या काळात स्त्रीयांनी विपुल प्रमाणात लोकवाङ्मय रचून ठेवले. अंधारयुगाचा हा

काळ इतका मोठा होता की प्रतिभावान मोजक्या स्त्रिया वगळल्या तर बाकी सामान्य स्त्रिया ह्या अज्ञानांधकारात आणि दास्यत्वात खोल खोल रूतत गेल्या. आपल्यातील अस्मिता त्या पूर्णतया विसरल्या. स्त्रियांच्या अज्ञानाच्या, सेवेच्या, त्यागाच्या पायावर कुटुंबाची उभारणी होत होती. माता म्हणून शब्दामध्ये मात्र तिचा गौरव शिल्लक राहिला होता. प्रत्यक्षात ती एक पाल्य, एक राबणारी पण स्वातंत्र्य नसलेली स्त्री बनली.

**स्त्रियांच्या उद्धाराचे प्रयत्न :-**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय स्त्रीच्या उद्धाराचे खरे प्रयत्न सुरू झाले. 1789 साली फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली आणि 'स्वातंत्र्य, समता, बंधुता या विचारांचे वारे पाश्चात्य देशात वाहू लागले. आठराव्या शतकातील सुधारणावादाच्या या विचारांना पाश्चात्य देशातील औद्योगिक क्रांतीने आणखी उठाव मिळाला. सर्व मानव जात एक आहे. स्त्री ही देखिल एक व्यक्ती आहे. या सर्वांना समान वागणूक मिळाली पाहीजे, व्यक्तीला आपला विकास करून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे, व्यक्ती विकासाच्या आड येणाऱ्या रूढी दूर झाल्या पाहिजेत हे स्वातंत्र्यवाद्यांच्या विचाराचे सूत्र होते.

**समाजसुधारकांची कामगिरी :-**

रूढी आणि परंपरांच्या चिखलात रूतलेल्या भारतीय स्त्रीयांना वर काढण्याचे, त्यांच्या शृंखला तोडण्याचे आणि त्यांना माणसात आणण्याचे काम प्रथम कुणी केले असेल तर ते 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात बंगाल आणि महाराष्ट्रात जे समाजसुधारक पुढे आले त्यांनी. ब्रिटीशांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य केले आणि भारताला गुलाम बनविले. पण या दिडशे वर्षांतच काही चांगल्या गोष्टी कळत नकळत घडून गेल्या. आपली राजवट चालविण्यासाठी ब्रिटीशांनी भारतीय जनतेला शिक्षण देण्यास

सुरूवात केली. इंग्रजी शिक्षणाचे वारे भारतात वाहू लागले. इंग्रजी शिक्षण मिळालेले काही विद्वान पंडीत या विचारांनी भारावून गेले. भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्था, स्रीयांना मिळणारी वागणूक या गोष्टी किती अन्यायाच्या आहेत ते त्यांना जाणवू लागले. व हे अन्याय दूर झाले पाहिजेत यासाठी त्यांनी हाती कंकण बांधले.

बंगालमध्ये पं. राजाराममोहन रॉय हे इंग्रजी शिक्षणाने असेच प्रभावित झाले. बंगालमध्ये सतीची चाल त्यावेळी बऱ्याच प्रमाणमध्ये होती. त्यांनी कायद्याचा अभ्यास केला. अशा कितीतरी मुली सतीच्या अन्यायाने मारल्या जातील त्यांना आपण वाचविले पाहिजे हा ध्यास त्यांनी घेतला. ब्रिटिश धोरण भारतावर राज्यकरताना धर्मात हस्तक्षेप करायचा नाही असे होते. परंतु राजाराममोहन रॉय यांनी निदान सती जाण्याची सक्ती तरी कुणाला करता येऊ नये म्हणून सतीबंदीचा कायदा करण्यास संसदेला भाग पाडले. 1829 साली सतीबंदीचा कायदा झाला व त्यामुळे या क्रुर चालीला आळा बसला.

बंगालमधील दुसरे समाजसुधारक म्हणजे पं. ईश्वरचंद्र विद्यासागर. त्यांच्या विचारावरही इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव होता. भारतातील बालविधवांची परिस्थिती, जरठकुमारी विवाह इ. अन्यायांकडे त्यांचे लक्ष वेधले. हिंदू धर्मग्रंथातून पुनर्विवाहाला कुठे आधार सापडतो का याचा शोध घ्यायला त्यांनी सुरूवात केली व त्यांना तो मिळाला. पुनर्विवाहाला असणारी बंदी दूर झाली पाहिजे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. या चळवळीत महाराष्ट्रीय समाजसुधारकांनीही पुष्कळ मदत केली. त्यात म. जोतिबा फुले, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, सर नारायण चंदावरकर, गोपाळ गणेश आगरकर, मोरोबा कान्होबा इ. प्रतिष्ठीत मंडळींचा समावेश होता. महाराष्ट्रातील सुधारकांनी स्त्रियांच्या मुक्ततेसाठी जी धडपड केली ती फारच महनीय आहे. त्यात महात्मा फुले अग्रेसर होते. [32]

19 व्या शतकातील एकंदरीत परिस्थिती पाहता समाजात अस्थिरता होती. परकीयांचे

राज्य चालू होते. जाती संस्था, परंपरागत रूढी, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात हाती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्ण व्यवस्थेवर आधारीत समाज व्यवस्था होती. ब्राह्मणांचे वर्चस्व मोठ्या प्रमाणावर होते. धर्माच्या नावाखाली लोकांवर अन्याय करती होते. शूद्रांना कोणतेचे अधिकार नव्हते. त्यांनी फक्त 'दास' बनून किंवा 'गुलाम' म्हणूनच रहावे. शूद्र अतिशूद्र लोकांनी एकत्र येऊ नये यासाठीही ते प्रयत्नशील रहात होते. सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात होती सर्व सरकारी जागांवर ब्राह्मणच असत. त्यामुळे सामान्य लोक मागे पडत राहीले.

अशा प्रकारची स्थिति असताना दुसरीकडे स्त्रियांविषयी समाजात कटुता होती. तिला कोणताही अधिकार नव्हता. शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रीने घराबाहेर पडू नये असे बंधन होते. विधवेने केशवपन करून घेतलेच पाहिजे अशी धारणा होती. शिवाय विधवेला कोणत्याही धार्मिक, सामाजिक कार्यात पुढे येण्यास बंदी होती. सर्वात वाईट म्हणजे बालविवाह पद्धत रूढ होती. न समजणाऱ्या वयात लग्न झाल्यानंतर लहानपणातच पती वारला तर त्या स्त्रीने आपले अखंड आयुष्य कुजवायचे अशी विचारसरणी त्या काळात होती. तिला जीवन जगणे नकोसे करून टाकणारे विचार अशी स्थिती होती.

असे असले तरी हिंदुसंस्कृतीचे एक वैशिष्ट की सतत संस्कृतीला नवनवीन स्वरूप प्राप्त करण्यासाठी नव विचारांची परंपरा निर्माण करणारे सुधारकही याच संस्कृतीने केले आहे. समाजातील हि भयानक स्थिति असली तरी यास छेद देऊन, समाजिक न्यायाच्या दृष्टीने अन्यायी अशा रूढींच्या विरोधात ठामपणे उभारलेले अनेक सुधारक आपणास दिसून येतात. महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाल्यास जोतिबा फुले, लोकहितवादी आगरकर, कर्वे, शिंदे, आंबेडकर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. यातही स्त्री स्वातंत्र्याचा निडरपणे पुरस्कार करणारे म. फुले यांचे कार्य अत्यंत श्रेष्ठ मानावे लागेल म्हणूनच त्यांचे हे कार्य आपण विस्तृतपणे पाहू.

## महाराष्ट्रातील समाजसुधारणेचे जनक : महात्मा जोतिबा फुले जीवन परिचय :-

महात्मा फुले यांचा जन्म 1827 मध्ये पुणे शहरात एका बऱ्यापैकी अशा आर्थिक कुटुंबात झाला. हे त्यांचे जन्माचे वर्ष आणि ठिकाण या दोन्हीनाही त्यांचे व्यक्तीमत्व घडविण्यात महत्वाचे स्थान आहे. ते एक वर्षाचे होण्यापूर्वीच त्यांची आई वारली. ते ब्राह्मण वा उच्चवर्णीय नसल्याने त्यांचे घर क्षुद्र अतिक्षुद्र मुसलमान, खिस्ती अशा मिश्र वस्तीत होते. जोतिबांचे मराठी शिक्षण एका सामान्य शाळेत झाले. व पुढे इंग्रजी शिक्षण खिस्ती मिशनरी शाळेत झाले. अशा कौटुंबिक, सामाजिक व शैक्षिणक पार्श्वभूमीवर फुले लहानाचे मोठे झाले.

19 व्या शतकाचे तिसरे चौथे दशक हा काळ आणि पुण्यासारखे शहर याही घटकांचा फुल्यांच्या जडण घडणीसंबंधी मागोवा घेताना विचार करणे आवश्यक आहे. 1818 साली पेशव्यांची राजकीय सत्ता संपली. ब्राह्मणी दांभिकतेचा, भ्रष्टतेचा, असहीष्णूतेचा आणि अरेरावीचा उच्चांक पेशवाईने अंत:काळी गाठला होता. त्यामुळे राजकीय सत्ता आणि आर्थिक लुटारूपणा या दृष्टीने पेशव्यांचे राज्य व इंग्रजी राज्य यामध्ये फारसा फरक पडला नाही तरी नागरी जीवनाच्या इतर क्षेत्रात समभावी व सेवाभावी तसेच इज्जतीची वागणूक हे सर्वसाधारण ब्राह्मणेतर समाजाला उत्तेजीत करणारे अनुभव मिळू लागल्याचा हा कालखंड आहे. आधुनिकतेबरोबरच सुरक्षा व शिस्त यांचाही प्रत्यय येऊ लागल्याने आणि शिक्षणाची दारे उघडली गेल्याने बदलाची, प्रगतीची संधी आल्याचा एक प्रकारे उत्साह या आजवरच्या दबलेल्या वा उपेक्षिलेल्या समाजामध्ये निर्माण झाला होता. त्याचवेळी इंग्रजी शिक्षणाची परदेश गमनाची संधी मिळालेल्या उच्चवर्णीय ब्राह्मणातूनही समाजसुधारणेचे नवे विचार घेऊन काही समाजसुधारक पुढे येऊ लागले होते. लोकहितवादी, रानडे यासारखी मंडळी जुन्या, बुरसटलेल्या सनातनी हिंदु धर्म कल्पनांचा,

वर्णव्यवस्थेचा, स्त्री पुरुष असमानेतचा व अस्पृश्यतेचा निषेध करून नव्या विचारांचा पुरस्कार करू लागले होते. त्याचवेळी सनातनी ब्राह्मण्यवादी मंडळी विलक्षण अस्वस्थ होऊन एक प्रकारे चवताळून या सुधारकांवर टिका करत परंतु हा आवेश बऱ्याचवेळा बोलण्यापुरताच मर्यादित राही. अनेक वेळा अवसान घातकी ठरे.

जोतिबांच्या सार्वजनिक जीवनाला 1848 पासून खरी सुरूवात झाली. इंग्रजी सत्ता तशी स्थिरावली होती आणि भारतीय जीवनातील सामाजिक सुधारणांना पोषक व संरक्षण देणारे कायदेही होऊ लागले होते. 1850 मध्ये जातीच्या पायावर नोकरीतील अपात्रता ठरविणारी पद्धत रद्द करण्याचा कायदा झाला. वर्णव्यवस्थेने सिलबंद करून ठेवलेले समाजातील विभाग आपसात मिळू मिसळू लागले. 1856 साली विधवा विवाहाला मान्यता देणारा कायदा झाला. स्त्री मुक्तीच्या विचाराला कायद्याची मान्यता मिळू लागली. 1857 साली घटस्फोट घेण्याच्या स्त्रियांच्या अधिकारालाही मान्यता देणारा कायदा झाला. सामाजिक परिवर्तनांच्या क्षेत्रातील या घटना व हे कायदे ज्योतिबातील परिवर्तनवादाला उत्तेजन देणारे ठरले.

महात्मा फुल्यांच्या ब्राह्मणविरोध हा वर्चस्ववादी ब्राह्मण्याला विरोध होता. प्रत्यक्षात त्यांच्या समाज सुधारणांच्या सर्व आघाड्यांवर त्यांचे मित्र, सहकारी एवढेच नव्हे तर मार्गदर्शकही काही ब्राह्मण होते. त्याही पेक्षा त्यांची शिक्षण, स्त्रीविमोचन, विधवा संरक्षण, अनाथ बालसंगोपन, या आघाडीवरील कामगिरी ही ब्राह्मण स्त्रिया व बालके यांना जीवदान देऊन स्वत:च्या पायावर उभे करणारी अशी होती. स्पृश्यांनी आपल्या मनातून व कृतीतून अस्पृश्यतेचा विचार काढून टाकला पाहिजे. असे प्रतिपादन करीत असताना स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करण्याची कृती फक्त फुलेच करू शकले. ब्राह्मण विधवा केशवपनाचा अत्याचार थांबला पाहीजे असे सांगून फुले थांबले नाहीत अर्थात त्यासाठी विधवांचे बंड करणे त्यावेळी शक्य नसल्याने न्हाव्यांना संप करण्याची अफलातून

सामाजिक व सामूहिक कृती करण्यात ते यशस्वी ठरले. त्यांनी बालहत्या-प्रतिबंधकगृह ही संस्थाही वाटचुकलेल्या स्त्रियांसाठीही सुरू केली. स्त्री शिक्षणाची आवश्यकता पटल्यावर स्वत:च्या बायकोला स्वत: शिकवून शिक्षिका बनविणारे फुले हे कर्तृत्वाचा आदर्श ठरतातच पण त्याही पुढे जाऊन स्त्री पुरुष समानतेचा विचार स्वत:च्या घरात राबविण्याचे एक अग्निदिव्यच जणू महात्मा फुल्यांनी पार पाडले.[33]

आपल्या विचारांना कृतीच्या मजबूत आधारावर उभे करणे ही फुल्यांच्या कर्तृत्वाची सर्वात आगळी अशी बाब प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. अशा प्रकारची फुल्यांच्या काळातील तत्कालीन समाजव्यवस्था होती. त्यांच्या विचारातील इतर दृष्टीकोणाचा अभ्यास पुढील प्रकरणांमध्ये केला जाणार आहे.

## :संदर्भ सूची :


1. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - भारतीय संस्कृती, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, 1992, पृ. क्र. 61
2. प्रा. (डॉ.) अंकुश रा. सावंत - मनुस्मृती एक समालोचन, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, 1996, पृ. क्र. 16
3. द. के. केळकर - संस्कृतिसंगम, मनोहर ग्रंथमाला पुणे, 1940, पृ. क्र. 1
4. आ. ह. साळुंखे - हिंदु संस्कृती आणि स्त्री लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, 1993, पृ. क्र. 1 ते 5
5. आशाराणी व्होरा - भारतीय नारी दशा, दिशा, नेशनल पब्लीसिंग हाऊस, पृ. क्र. 3 व 4
6. आ. ह. साळुंखे - उपरोक्त पृ. क्र. 21 व 22
7. आशाराणी व्होरा - उपरोक्त पृ. क्र. 82
8. आ. ह. साळुंखे - उपरोक्त पृ. क्र. 88
9. कित्ता - पृ. क्र. 99
10. कित्ता - पृ. क्र. 99
11. कित्ता - पृ. क्र. 99
12. कित्ता - पृ. क्र.९९
13. आशाराणी व्होरा - उपरोक्त, पृ. क्र. 4 व 5

14. आ. ह. साळुंखे - उपरोक्त, पृ. क्र. 99

15. कित्ता - पृ. क्र. 29 ते 33

16. आशाराणी व्होरा - उपरोक्त पृ. क्र. 6

17. आ. ह. साळुंखे - उपरोक्त पृ.क्र. 100

18. कित्ता - पृ. क्र. 100

19. कित्ता - पृ. क्र. 86

20. आशाराणी व्होरा - उपरोक्त पृ. क्र. 7

21. प्रा. (डॉ.) अंकुश रा. सावंत - उपरोक्त पृ. क्र. 59

22. कित्ता - पृ. क्र. 82

23. कित्ता - पृ. क्र. 82

24. कित्ता - पृ. क्र. 61

25. कित्ता - पृ. क्र. 62

26. कित्ता - पृ. क्र. 62

27. कित्ता - पृ. क्र. 62

28. कित्ता - पृ. क्र. 63

29. कित्ता - पृ. क्र. 63

30. आ. ह. साळुंखे - उपरोक्त पृ. क्र. 91

31. आशाराणी व्होरा - उपरोक्त पृ. क्र. 7 व 8

32. अनुसया लिमये - स्त्रीचे समाजातील स्थान आणि भूमिका समाजवादी महिला सभा, पुणे. 1976. पृ. क्र. 14 ते 22

33. आचार्य शांताराम गरूड - म. फुले- डॉ. आंबेडकर मेदिन शताब्दी, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी 1990, पृ. क्र. 6 ते 9


****